- RNI NO. MAHMAR/25/A3029
- लातूर
- वर्ष : ७ वे, अंक नं. : ३९
- दि. ३० मे २०२६, वार : शनिवार
- पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990


# महाराष्ट्र केवळ भारतातच नव्हे तर जगात एआयचे नेतृत्व करेल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## ‘मुंबई टेक वीक २०२६’ चे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र एआय क्रांतीचे नेतृत्व करण्यासाठी अत्यंत सक्षम स्थितीत आहे. मुंबईची आर्थिक ताकद, तंत्रज्ञान कौशल्य, मजबूत स्टार्टअप परिसंस्था आणि नवतंत्रज्ञान स्वीकारण्याची तयारी यामुळे आगामी काळात महाराष्ट्र केवळ भारतातच नव्हे तर जगात एआयचे नेतृत्व करेल,’’ असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे व्यक्त केला.

मुंबईतील बीकेसी येथे ‘मुंबई टेक वीक २०२६’ चे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी घेण्यात आलेल्या मुलाखतीत मुख्यमंत्र्यांनी दिलखुलास उत्तरे दिले. या कार्यक्रमाला मुंबईच्या महापौर रितू तावडे, मुंबई मनपा आयुक्त अश्विनी भिडे, महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी, तसेच प्रशासकीय अधिकारी, उद्योजक, स्टार्टअप संस्थापक, गुंतवणूकदार आणि जागतिक तंत्रज्ञान कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.





महाराष्ट्र शासनाने १० हजार कोटी रुपयांची एआय गुंतवणूक, दीड लाख रोजगार निर्मिती, सहा ‘सेंटर ऑफ एक्सलन्स’ आणि विशेष ‘एआय इनोव्हेशन क्षेत्रे’ उभारण्याचे उद्दिष्ट निश्चित केले असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, एआय क्षेत्रातील संशोधन आणि नवकल्पनांना चालना देण्यासाठी राज्य सरकार ‘कम्प्युट-अॅज-अ-सर्व्हिस’ सुविधा निर्माण करत आहे. त्याद्वारे नवउद्योजक आणि संशोधकांना २ हजार जीपीयू उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. उच्च क्षमतेच्या कम्प्युटिंग सुविधा परवडत नसल्यास नवकल्पना थांबते. त्यामुळे महाराष्ट्र शासन थेट पायाभूत सुविधा उपलब्ध करून देत आहे.

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, सरकार फक्त धोरणात्मक चौकट तयार करू शकते; पण खरी स्टार्टअप परिसंस्था संस्थापक आणि उद्योजक घडवतात. डिसेंबर २०२२ मध्ये टेक उद्योजकांच्या संघटनेची संकल्पना प्रथम मांडण्यात आली होती, त्यावेळीच त्यांच्या कामातील ऊर्जा आणि दृष्टी पाहून हा उपक्रम मोठा होईल, असा विश्वास वाटला.

आता प्रत्येक वर्षी अधिकाधिक संस्थापक, गुंतवणूकदार आणि जागतिक कंपन्या महाराष्ट्राशी जोडल्या जात आहेत. सलग तीन वर्षे महाराष्ट्र हा गुंतवणूक आणि स्टार्टअप संख्येनुसार देशातील अग्रगण्य राज्य ठरले आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

देशभरातून आणि विदेशातून मुंबई टेक वीकमध्ये सहभागी झालेल्या स्टार्टअप्स आणि तंत्रज्ञान कंपन्यांना उद्देशून मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्रात गुंतवणुकीचे आवाहन केले आणि ते म्हणाले ‘‘तंत्रज्ञान आणि एआय क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी हा सर्वोत्तम काळ आहे आणि महाराष्ट्र ही सर्वोत्तम कार्यभूमी आहे. येथे आधीच सक्षम परिसंस्था तयार झाली आहे. महाराष्ट्रासाठी काम करा, भारतासाठी काम करा आणि जगासाठी नवकल्पना घडवा.’’

राज्य शासन केवळ इनक्युबेशन आणि अॅक्सेलरेशनपुरते मर्यादित नसून ‘फंड ऑफ फंड्स’च्या माध्यमातून गुंतवणूक सहाय्यही देत आहे. शासन भागीदार म्हणून तुमच्यासोबत उभे राहण्यास तयार आहे, असे आश्वासनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

राज्य शासनाच्या विविध विभागांमध्ये एआयच्या वाढत्या वापराची उदाहरणे देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी ‘महा-विस्तार’ या शेतकरी अॅपचा विशेष उल्लेख केला. हे शेतकऱ्यांसाठी एक ‘वन स्टॉप सोल्युशन’ आहे. भारत एआय परिषदेत केंद्र सरकारने त्याला देशातील सर्वोत्तम शेतकरी उपाय म्हणून गौरविले आहे. आता ‘इंडिया-विस्तार’ संकल्पना त्याच धर्तीवर विकसित होत आहे. तसेच बांधकाम परवानगी प्रक्रियेत एआय आधारित प्रणालीमुळे पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढणार असल्याचे त्यांनी सांगितले.

गुन्हे तपास आणि न्यायप्रक्रियेसाठी तयार करण्यात आलेल्या ‘क्राईम ओएस’ प्लॅटफॉर्मचा उल्लेख करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, या प्रणालीमुळे तपास, चार्जशीट तयार करणे आणि न्यायालयीन प्रक्रिया अत्यंत वेगवान होणार आहे. पूर्वी १५ हजार पानांच्या आरोपपत्रासाठी तीन-चार महिने लागत; आता एआयमुळे ते दहा-बारा दिवसांत शक्य होणार आहे.

वैद्यकीय विमा योजनांतील गैरव्यवहार शोधणे, एचआर स्टॅकद्वारे शासकीय मनुष्यबळ व्यवस्थापन सुधारणे, वाहतूक नियंत्रण, आपत्ती व्यवस्थापन आणि निगराणी व्यवस्था यांसारख्या क्षेत्रांतही एआयचा प्रभावी वापर सुरू आहे. राज्य सरकारने विविध विभागांसाठी ५० एआय इंजिन विकसित करण्याचे उद्दिष्ट ठेवले असल्याची माहितीही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली.

एआयच्या वेगवान विस्तारासोबत निर्माण होणाऱ्या ‘डीपफेक’, डेटा सुरक्षा आणि विश्वासार्हतेच्या प्रश्नांवर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, ‘‘एथिकल एआय’’ हीच राज्याच्या धोरणाची मध्यवर्ती संकल्पना आहे. एआय सर्वांसाठी उपलब्ध असला पाहिजे. तो केवळ मोठ्या कंपन्यांचा विशेषाधिकार राहता कामा नये. एमएसएमईंनाही त्याचा लाभ मिळायला हवा, तसेच एआयमध्ये मानवी हस्तक्षेप आणि मानवी मूल्ये केंद्रस्थानी असणे आवश्यक आहे. असेही प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले.




## संपादकीय...

# केंद्राचे स्वागतार्ह पाऊल

पूर्वोत्तर राज्यांतील घुसखोरी आणि त्यामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर भाष्य करताना देशाच्या एका माजी गृह राज्यमंत्र्यांनी केलेले 'हम बारूद के ढेर पे बैठे है' असे वक्तव्य बरेच बोलके आहे. सीमावर्ती भागांत आणि काही विशिष्ट राज्यांमध्ये होणारे अनैसर्गिक लोकसांख्यिकीय बदल देशाच्या सार्वभौमत्वाला, राष्ट्रीय सुरक्षेला आणि सांस्कृतिक अस्तित्वाला गिळंकृत करू पाहत आहे. या पृष्ठभूमीवर, १५ ऑगस्ट २०२५ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून या विषयाच्या अभ्यासासाठी उच्चस्तरीय समितीची घोषणा केली होती. त्यानुसार, सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती प्रकाश नावलेकर यांच्या अध्यक्षतेखाली आता समितीची स्थापना करण्यात आली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी, देशाच्या भविष्यकालीन सुरक्षेसाठी हे किती अनिवार्य आहे, याचे महत्त्व विशद केले आहे. भारताचे वर्तमान आणि भविष्यातील अंतर्गत सुरक्षेसाठी हे ऐतिहासिक पाऊल मानले पाहिजे. पूर्वोत्तर राज्यांमध्ये, विशेषतः पश्र्चिम बंगाल आणि आसाममध्ये गेल्या काही दशकांत लोकसंख्येचे जे चित्र बदलले आहे, ते फार चिंताजनक आहे. उपलब्ध आकडेवारी आणि विविध अहवालांचे विश्र्लेषण केल्यास असे दिसते की, या राज्यांच्या सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये एका विशिष्ट समुदायाच्या, म्हणजेच मुस्लिम लोकसंख्येच्या वाढीचा वेग देशाच्या सरासरी दरापेक्षा कितीतरी जास्त आहे. आसाममधील धुबरी, मरीगाव, गोआलपारा, बारपेटा आणि नागाव यासारख्या अनेक जिल्ह्यांमध्ये आज हा समुदाय बहुसंख्य झाला आहे. पश्र्चिम बंगालच्या मालदा, मुर्शिदाबाद आणि उत्तर दिनाजपूर या जिल्ह्यांमध्येही त्यांच्या लोकसंख्येचे पारडे जड झाले आहे. १९५१ ते २०११ च्या जनगणनेपर्यंत आणि त्यानंतरच्या गृह मंत्रालयाच्या अंतर्गत सर्वेक्षणानुसार, या सीमावर्ती भागांतील हिंदू आणि स्थानिक आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण सातत्याने घटत आहे. दुसरीकडे मुस्लिम लोकसंख्या झपाट्याने वाढली आहे. ही वाढ केवळ नैसर्गिक प्रजननामुळे झालेली नाही, तर त्यामागे जाणीवपूर्वक केली जात असलेली खेळी आहे, हे आता लपून राहिलेले नाही. या असमतोलामुळे पूर्वोत्तर राज्ये सांस्कृतिकदृष्ट्या विलग होण्याची भीती व्यक्त केली जात आहे आणि ती रास्त वाटते. या भागातील अनैसर्गिक लोकसांख्यिकीय बदलाचे मुख्य कारण म्हणजे बांगलादेश आणि म्यानमारमधून होणारी अवैध घुसखोरी. भारताची हजारो किलोमीटरची पूर्व सीमा ही नद्या, जंगलांनी व्यापली आहे. त्याचाच गैरफायदा घेऊन लाखो घुसखोर दरवर्षी भारतात येतात. ही घुसखोरी आता केवळ रोजगाराच्या शोधात आलेली गर्दी राहिलेली नाही, तर ती सुनियोजित कारस्थानाचा भाग झाली आहे. काही स्थानिक राजकीय पक्षांनी 'व्होट बँके'साठी घुसखोरांचे लांगूलचालन केले. त्यांना अवैधरीत्या रेशन कार्ड, आधार कार्ड आणि मतदार ओळखपत्रे मिळवून दिली. एव्हाना, देशाच्या इतर भागांतही या घुसखोरांनी स्थानिक आदिवासी आणि गरीब नागरिकांच्या जमिनींवर, त्यांच्या हक्काच्या रोजगारावर आणि संसाधनांवर कब्जा केला आहे. घुसखोरांच्या गुंडागर्दीने आया-बहिणींची अब्रू धोक्यात आली आहे. त्याचा प्रत्यय बंगालमध्ये नुकताच आला. खरे तर, 'माँ-माटी-माणूस' अशी घोषणा देत 'दीदी' सत्तेत आल्या होत्या. पण घुसखोरांकडून स्थानिक महिलांवर होत असलेला अत्याचार त्यांना दिसला नाही. त्यामुळे दीदींच्या घोषणेतील 'माँ' दूर गेली आणि निवडणुकीत दीदीची वाट लागली. घुसखोरीमुळे देशातील मूळ नागरिकांचा रोजगार हिरावला जात असून, राष्ट्रीय साधनसंपत्तीवर कधी नव्हे एवढा ताण येत आहे, हे त्यातले आणखी एक 'व्हर्टिकल'. अनैसर्गिक लोकसांख्यिकीय बदलाचा केवळ भौगोलिक आणि राजकीय परिणाम होतोच. शिवाय, सामाजिक आणि सांस्कृतिक रचनेवरही त्याचा खोल आघात होतो. गेल्या काही वर्षांत देशातील विविध भागांतून, विशेषतः केरळ, कर्नाटक, उत्तर प्रदेश आणि झारखंडच्या आदिवासी पट्ट्यातून 'लव्ह जिहाद'सारख्या गंभीर प्रकरणांची मालिका समोर आली आहे. फसवणुकीच्या मार्गाने बहुसंख्य समाजातील मुलींना आणि विशेषतः आदिवासी मुलींना जाळ्यात ओढले जाते, त्यांच्याशी लग्न केले जाते आणि त्यानंतर त्यांचे सक्तीने धर्मांतर केले जाते. आदिवासी मुलींशी लग्न करून घुसखोर तेथील राखीव जमिनींवर मालकी हक्क मिळवतात. पुढे स्थानिक पंचायतींच्या निवडणुकांमध्ये राजकीय सत्ताही हस्तगत करतात. त्यामुळे स्थानिक संस्कृती तर नष्ट होत आहेच, सामाजिक सलोख्यालाही मोठा धोका निर्माण झाला आहे. न्या. नावलेकर समितीला या सामाजिक आणि छुप्या पद्धतींचाही सखोल अभ्यास करावा लागणार आहे. जमीन, पाणी, अन्न, आरोग्यसेवा आणि शिक्षण ही संसाधने नेहमीच मर्यादित असतात. एखाद्या देशात कायदेशीर नागरिकांच्या सोबतीने कोट्यवधी अवैध घुसखोर राहू लागतात, तेव्हा त्या देशाच्या अर्थव्यवस्थेवर आणि पायाभूत सुविधांवर प्रचंड ताण येतो. भारताच्या अनेक महानगरांमध्ये आणि सीमावर्ती राज्यांमध्ये झोपडपट्ट्यांची संख्या प्रचंड वाढत आहे. गुन्हेगारीत वाढ झाली आहे आणि बनावट नोटा, ड्रग्जची तस्करी तसेच दहशतवादी कारवायांनाही पाठबळ मिळण्यासाठी सुपीक जमीन तयार होत आहे. राष्ट्रीय सुरक्षा आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्र्न अत्यंत बिकट झाला आहे. हे लोकसंख्येचे असंतुलन असेच सुरू राहिले, तर परिस्थिती आणखी चिघळेल, हे समजून घेतले पाहिजे. ज्या ज्या देशांनी आपल्या सीमांकडे दुर्लक्ष केले आणि अंतर्गत लोकसांख्यिकीय बदलांना गांभीर्याने घेतले नाही, त्या देशांचा भूगोल आणि संस्कृतीही नष्ट झाली हा इतिहास आहे. त्याचे सर्वांत मोठे उदाहरण म्हणजे 'लेबनॉन'. १९५० च्या दशकात लेबनॉन हा मध्यपूर्वेतील अत्यंत प्रगत देश होता, त्याला पूर्वेचे पॅरिस म्हटले जायचे. परंतु, पॅलेस्टिनी निर्वासितांच्या लोंढ्यामुळे आणि त्यानंतर झालेल्या अनैसर्गिक लोकसंख्या बदलामुळे अवघ्या दोन-तीन दशकांत तेथे यादवी माजली. आज तो देश पूर्णपणे उद्ध्वस्त झाला आहे. युरोपमधील 'कोसोव्हो' हे आणखी एक उदाहरण. तेथे अल्बेनियन मुस्लिम लोकसंख्येच्या अनैसर्गिक वाढीमुळे सर्बियाचा हा ऐतिहासिक भाग वेगळा झाला. हाच धोका सध्या 'ग्रेट ब्रिटन' आणि संपूर्ण युरोपसमोर उभा ठाकला आहे.ळपवळरप ीिश्रींळेप ब्रिटनमध्ये गेल्या काही वर्षांत आशियाई आणि आफ्रिकन देशांतून आलेल्या मुस्लिमांची संख्या प्रचंड वाढली आहे. लंडन, बर्मिंगहॅम आणि लेस्टर यासारख्या शहरांमध्ये स्थानिक इंग्लिश लोकसंख्या अल्पमतात येत आहे. तेथे पाश्र्चात्त्य मूल्यांना आणि कायद्यांना आव्हान देणारे 'शरिया झोन्स' तयार होऊ लागले आहेत. परिणामी, मूळ इंग्लिश नागरिकांमध्ये तीव्र असंतोष असून, देशाची संस्कृती वाचवण्यासाठी उजव्या विचारसरणीची मोठी आंदोलने उभी ठाकली आहेत. दंगली उसळत आहेत. युरोपचे हे जळजळीत वास्तव भारतासाठीही धोक्याची घंटा आहे. औदार्य माणसांना दाखवायचे असते, अमानुष प्रवृत्तींना नव्हे, हे आता युरोपला समजले आहे. चीनला ते आधीच समजले होते. लोकसांख्यिकीय संतुलन राखण्यासाठी चीनने अत्यंत कठोर आणि दीर्घकालीन धोरण अवलंबले आहे. त्या देशाने केवळ 'एक अपत्य धोरण' राबवून लोकसंख्या नियंत्रित केली. देशाच्या अंतर्गत भागात सांस्कृतिक संतुलनही बिघडू दिले नाही. शिनजियांग प्रांतात जेव्हा उईघुर मुस्लिम लोकसंख्येमुळे फुटीरतावादाचा आणि लोकसांख्यिकीय असंतुलनाचा धोका निर्माण झाला, तेव्हा चीनने अत्यंत कठोर पावले उचलली. तेथे 'हान' वंशाच्या लोकांचे मोठ्या प्रमाणात पुनर्वसन करून संतुलन साधले. तसेच कट्टरवाद्यांना चिरडून टाकले. चीनचे हे 'मॉडेल' लोकशाही देशात जसेच्या तसे लागू करणे शक्य नसले, तरी देशाच्या सुरक्षेसाठी कठोर निर्णय घ्यावे लागतात, हा धडा त्यातून घेता येतो. या पृष्ठभूमीवर, केंद्र सरकारने स्थापन केलेली न्या. प्रकाश नावलेकर समिती ही भारताच्या अंतर्गत सुरक्षेच्या दृष्टीने स्वागतार्ह पाऊल आहे. ही समिती सुनियोजित आणि कालबद्ध पद्धतीने या अनैसर्गिक लोकसंख्या बदलांचे व्यापक मूल्यांकन करेल आणि त्यावर ठोस उपाय सुचवेल, असा विश्र्वास आहे. कोणतीही अनैसर्गिक वाढ कॅन्सरसारखी घातक असते. त्यामुळे हा निर्णय घेतला गेला. देशाचे सार्वभौमत्व आणि भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी सरकारच्या या दूरगामी निर्णयाचे देशपातळीवर स्वागत व्हायलाच हवे.

# लातूर ग्रामीण मध्ये क्रांती घडविणारे लोकप्रिय आमदार रमेशअप्पा कराड

## 'रामेश्वरच्या मातीत उगवला मानाचा तुरा लातूरच्या मुकुटात शोभला रामेश्वरचा हिरा'







लातूर ग्रामीणच्या राजकीय, सामाजिक आणि वैचारिक इतिहासाने नोंद घेण्यासारखे कार्य करणारे लोकनेते म्हणून रमेशअप्पा कराड यांनी अल्पावधीतच स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली. जन्मापासूनच अध्यात्माचा वारसा लाभलेल्या रामेश्वरच्या कराड घराण्यात रमेशअप्पांचा जन्म झाला. डॉ. विश्वनाथ दा. कराड ऊर्फ अण्णाभाऊ यांच्या सुसंस्कृत, कुटूंबवत्सल मार्गदर्शनात अप्पांनी आपल्या विचारांचा वारसा पुढे चालू ठेवला.

लातूर ग्रामीण मध्ये केवळ राजकारण न करता रमेशअप्पांनी लोकांना संस्काराची समन्वयाची आणि विकासाची एक नवी दिशा दाखवली आहे. कराड घराण्यात राजकारणाचा कुठलाही वारसा नसताना रमेशअप्पांनी तो स्वतः निर्माण केला. त्यांचे प्रतिबिंब ऋषिकेश कराड यांच्या रूपाने लातूर ग्रामीणच्या लोकांना अनुभवायला मिळत आहे. आपल्याला मिळालेल्या लोकप्रियतेचा आणि पदाचा वापर स्वतःच्या फायद्यासाठी न करता जनतेच्या विकासासाठी करणारे एकमेव आमदार म्हणून रमेशअप्पा कराड यांना सर्वत्र ओळखले जाते.

वर्षानुवर्षापासून प्रस्थापित राजकारण्यांच्या दुर्लक्षामुळे मूलभूत सुविधांपासून वंचित असलेल्या लातूर ग्रामीणच्या जनतेला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत होते. स्वतःच्या यशापयशाचा विचार न करता आ. रमेशअप्पा कराड यांनी अविरतपणे जनतेच्या सेवेसाठी समर्पण भावनेतून आपले कार्य चालू ठेवले.

विशेषतः पर्यावरण रक्षणासाठी लोकांना प्रेरणा मिळावी म्हणून लातूर ग्रामीण मतदारसंघातील प्रत्येक गावामध्ये वृक्षारोपणासाठी मोठी मोहीम चालू केली स्वखर्चाने वृक्षारोपण केले. लोकांच्या आरोग्य रक्षणासाठी एम.आय.एम.एस.आर. वैद्यकीय महाविद्यालय व यशवंतराव चव्हाण ग्रामीण रूग्णालया मार्फत प्रत्येक गावामध्ये आरोग्य शिबिरे घेतली. अध्यात्माच्या माध्यमातून लोकप्रबोधन करण्यासाठी अप्पांनी गावोगावच्या भजनी मंडळांना भजन साहित्याचे वाटप केले. लातूर ग्रामीणच्या अनेक गावांमधील गणेश मंडळांना गणेश मूर्तीचे वाटप केले. आपल्या ग्रामीण मतदारसंघातील कोणत्याही कुटुंबावर कसलेही संकट आले तर आ. रमेशअप्पा कराड संकटग्रस्त कुटुंबाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहतात. मागील काळात पुराने उध्वस्त झालेली कुटुंबे, आगीने भस्मसात झालेले अनेक घरे रमेशअप्पांनी स्वखर्चाने उभारली आहेत. आ. रमेशअप्पा हे मतदारसंघातील लोकांना मदत करताना कधी जातीपातीचा विचार करत नाहीत.

लातूर ग्रामीण मतदारसंघातील जनतेच्या दैनंदिन अडचणी लक्षात घेऊन रमेशअप्पांनी प्रत्येक गावात पायाभूत सुविधा उभारण्यावर भर दिला असून आज प्रत्येक गावात रस्ते, वीज, पाणी, आरोग्य व शिक्षण सर्व दूरपर्यंत म्हणजे शेवटच्या घरापर्यंत पोहोचले आहे.

आ. रमेशअप्पा कराड हे कुशल संघटक असून त्यांची प्रशासनावर पकड आहे. लाखो लोकांच्या र्‍हदयातील ते एक ताईत बनले आहेत. कुठल्याही जातीपातींचा विचार न करता ते बहूजन समाजासाठी रात्रंदिवस अविरतपणे कार्य करत आहेत. सतत कार्यरत राहून लोकांच्या समस्यांची सोडवणूक करणाऱ्या आमदार रमेशअप्पा कराड साहेबांना उदंड दीर्घायुष्य लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना...!



**प्रा. धनंजय दत्तात्रय बिक्कड**
**रा. फकराबाद**
**ता. वाशी जि. धाराशिव.**

# 'जनसंपर्कातून जनविश्वास जपणारा नेता'

## जनतेसाठी दरबार भरवणारा आमदार रमेशअप्पा कराड

**लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीत बहाद्दर मतदारांनी ऐतिहासिक नवा इतिहास घडविला मा. रमेशअप्पा कराड साहेब यांना विधानसभेत पाठवून जनतेनी जनहितासाठी नेता निवडला. आमदार झाल्याने त्यांच्यात कसलाही बदल झाला नाही आजच्या बदलत्या काळात एकमेकांचा संवाद कमी होत असताना रमेशअप्पा मात्र सर्वसामान्यांच्या थेट संपर्कात आहेत. संवाद कार्यालयात दिवसभर भेटण्याकरिता उपलब्ध असतात. त्यांना भेटण्यासाठी कोणाच्या मध्यस्थीची गरज नाही हे विशेष. लातूर ग्रामीण मतदारसंघ हेच माझे कुटुंब याच भावनेतून त्यांनी आमदारकीच्या माध्यमातून गोरगरीब सर्व सामान्यांच्या डोळ्यातील अश्रु पुसण्याचा प्राधान्याने प्रयत्न केला. जनता दरबारातून जनतेचे प्रश्न मार्गी लावले. गावा गावात, वाडीवस्तीत विकास कामासाठी कोट्यावधीचा निधी मिळवून देऊन गाव खेड्यात विकास काय असतो हे दाखवून दिले दिले. सामान्य कार्यकर्त्यांना मानसन्मान मिळवून देणारे संघर्षशील नेतृत्व मा. आ. रमेशअप्पा कराड साहेब यांचा आज जन्मदिवस. यानिमित्ताने त्यांना मन:पूर्वक शुभेच्छा !!!.**

**-चंद्रकांत कातळे, रेणापूर.**







काबाड कष्ट करणाऱ्या शेतकरी, शेतमजूरांच्या घामाचे मोल झाले पाहिजे; सर्व सामान्यांना, गोरगरीबांना त्यांचा न्यायहक्क मिळाला पाहिजे यासाठी सतत संघर्ष करणारे आणि लातूर ग्रामीण मतदारसंघ हेच माझे कुटुंब या भावनेतून कार्यरत असणारे भाजपाचे नेते मा. रमेशअप्पा कराड साहेब हे जनसामान्यांच्या मनातील संघर्षशील आणि विश्वासपात्र नेते आहेत. गेल्या विधानसभा निवडणुकीत बहाद्दर मतदारांनी ग्रामीण मतदारसंघातून रमेशआप्पांना बहुमताने विजयी करून एक नवा इतिहास घडविला. खऱ्या अर्थाने हा विजय आप्पांचा नव्हे तर सर्वसामान्य अठरापगड गोरगरीब जनतेचा असं म्हटलं तर वावगं ठरणारे नाही.

### जनतेनी निवडलेला नेता

लातूर तालुका हा काँग्रेसचा बालेकिल्ला या भागात भाजपाचे काम करणे तसे अवघडच होते, मात्र जिद्दीने जोमाने जिवाभाचे कार्यकर्ते निर्माण करुन त्यांच्या सुख दुःखात सहभागी होऊन प्रस्थापित शक्ति विरुद्ध सतत संघर्ष करत रमेशअप्पा कराड यांनी कार्यकर्त्यांचे जाळे निर्माण करुन भाजपाचे आणि स्वतःचे अस्तित्व उभे केले. आ. रमेशअप्पा यांची जिद्द, आत्मविश्वास, चिकाटी आणि कठोर परिश्रम करण्याची तयारी अनेकवेळा अनुभवायला मिळाली. मागील दोन विधानसभा निवडणुकीत पराभूत झाले मात्र कधीच खचले नाही. ''खचले ते आप्पा कसले'' पराभव झाल्याच्या दुसऱ्या दिवशीपासून पुन्हा त्याच उमेदीने गोरगरीब सर्वसामान्य माणसाच्या हितासाठी कार्यरत राहीले. याचा परिणाम गेल्या विधानसभा निवडणुकीत दिसून आला. जनतेनीच ही निवडणूक हातात घेतली आणि धनशक्ती, एकाधिकारशाही, हुकूमशाही विरुद्ध आवाज उठवून लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात नवा इतिहास घडविला आणि रमेशआप्पांना विधानसभेत पाठविले. हक्काचा आमदार निवडून आणला. खऱ्या अर्थाने जनतेने जनहितासाठी नेता निवडला असे बोलले तर वावगे ठरणारे नाही.

### जनतेच्या कायम संपर्कात

एखादा माणूस कुठल्याही पदावर निवडून गेला तर त्याच वागणं, त्याच राहणं, सामान्यांना कमी भेटणं, भेटायचं असेल तर वेळ घ्यावा लागतो असा खूप मोठा बदल झालेला आपणास पहावयास मिळतो. मात्र याला अपवाद ठरले ते रमेशअप्पा कराड. सर्वसामान्याच्या हितासाठी, अडचणीत सापडलेल्या, पिचलेल्या माणसाचे प्रश्न सुटले पाहिजेत, त्यांच्या डोळ्यातील अश्रू पुसता आले पाहिजे याच भावनेतून पदावर असो अथवा नसो रमेशआप्पांचे कार्य गेली वर्षानुवर्ष सुरू आहे. आमदार झाल्यानंतर त्यांच्यात कसलाही बदल झाला नाही उलट ज्या माणसांनी माझ्यावर विश्वास ठेवला मला मतदान रुपी आशीर्वाद दिले त्यांचे प्रश्न सोडवता यावेत त्यांच्या अडचणीत मदत करता यावी केवळ यासाठीच संवाद संपर्क कार्यालय सुरू केले.



बदलत्या काळात संवाद कमी होत असताना या संवाद कार्यालयाच्या माध्यमातून नियमितपणे सकाळी आकरा पासून रात्री किमान आठ पर्यंत येणाऱ्या प्रत्येकाशी संवाद साधण्याचा रमेशअप्पा प्रयत्न करतात. एवढेच काय तर कधीही रात्री अपरात्री सधा फोन करून कुणीही आप्पाशी संवाद साधू शकतो, बोलू शकतो. आप्पांना भेटण्यासाठी कुण्या मध्यस्थीची गरज नाही. थेट सहज भेट होते. संवाद कार्यालयात आलेल्या प्रत्येकाना विचारपूस केली जाते चहापाणी दिले जाते, अडचणी समजून घेऊन लगेच रमेशअप्पा संबंधितांना फोन करून प्रश्नाची सोडवणूक करतात. येणारा प्रत्येकजण रिकाम्या हाताने परत जात नाही. ग्रामीण भागातून आलेल्या सामान्यांना भेटीची अपेक्षा असते चार शब्द बोलण्याची इच्छा असते हे सर्व सहज घडून येत असल्याने सर्वसामान्य माणसात आप्पाबद्दलची आस्था आपुलकी आणि जिव्हाळा अधिकच दृढ होत आहे.

### निधी व विकास कामाचे नियोजन

आमदार, खासदार, जिल्हा परिषद सदस्य व नगरसेवक यांना मिळणाऱ्या स्थानिक विकास निधीच्या बाबतीत आजपर्यंत अनेकांना वेगवेगळे अनुभव आले आहेत बरेच जण टक्केवारी शिवाय निधीच देत नाहीत काही लोकप्रतिनिधी तर छुपी गुत्तेदारी करतात मात्र याला रमेशअप्पानी छेद देत आमदार निधी वाटप असो की शासनाकडून एखाद्या योजनेमार्फत मिळालेल्या विकास निधी असेल याबाबतीत गावनिहाय नियोजन करून त्या गावात कुठल्या कामाची गरज आहे त्यानुसार गावातील कार्यकर्त्यांनी एकत्र बसून काम कोण करणार हे निश्चित झाल्यास त्या व्यक्तीला निधी दिला जातो त्यानुसार त्या गावात विकासाचे काम होते. यामुळे कामाचा दर्जा, गुणवत्ता दिसून येते. रमेशआप्पांच्या या नियोजनामुळे मतदार संघातील प्रत्येक गावागावात वाडी वस्तीत आमदार निधी अथवा शासनाची कोणती ना कोणती योजना राबविण्यात आली आहे. आजपर्यंतच्या कुठल्याही विकास कामात कसल्याही प्रकारची अपेक्षा न ठेवता ग्रामीण भागाचा विकास झाला पाहिजे केवळ याच भावनेतून निष्कलंकपणे विकास कामा कडे लक्ष घालून कार्य केले आहे.

### जनता दरबार भरवणारा नेता

सर्वसामान्य जनतेचे प्रश्न व्यथा आणि अडीअडचणी समजून घेता याव्यात त्यांच्याशी संवाद साधता यावा, ज्यांनी आपल्याला आशीर्वाद देऊन विधानसभेत पाठवले त्यांच्या प्रश्नाची सोडवणूक व्हावी याकरिता आ. रमेशअप्पा कराड साहेब यांनी जनता दरबार ही संकल्पना अत्यंत प्रभावीपणे राबवली. मतदार संघातील ममदापूर, मुरुड, रेणापूर, भादा व इतर ठिकाणी घेण्यात आलेल्या जनता दरबारास प्रचंड मोठा प्रतिसाद मिळाला. जिल्हा, तालुका स्तरावरील विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी आणि सर्व सामान्य जनता आमने-सामने आल्याने अनेक प्रश्न चर्चा झाली निकाली निघाले. अतिक्रमित शेतरस्ते, वीज प्रश्न, अवैध दारू, रस्त्याचे प्रश्न, पीक विमा, अनुदान, निराधारच्या पगारी, राशन दुकानचे प्रश्न, प्रवासी बस थांबे, घरकुल, स्मशानभूमी, कबाले यासह विविध वर्षानुवर्ष प्रलंबित असलेल्या समस्यांचा नागरिकांनी या दरबारात पाढा वाचला, गऱ्हाणे मांडले. संबंधित अधिकाऱ्यांना कर्तव्यात कसूर न करता सामान्यांचे प्रश्न सोडवा अशी सूचना करून आडवणूक केली तर माफ करणार नाही असा दम ही त्यांनी दिला. एकूणच सामान्यांच्या प्रश्नासाठी आग्रही राहून दिलासा देण्याचे काम आ. रमेशअप्पा कराड यांनी केले आहे. जनतेसाठी जनता दरबार भरवणारा नेता हीच भावना सामान्य जनतेतून दिसून आली.

मागील काळात झालेल्या विविध निवडणुकीत पक्षाला घवघवीत यश आणि सामान्य कार्यकर्त्यांना सन्मानाची पदे मिळवून दिली. केंद्रशासन आणि राज्यशासन यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा करून लातूर ग्रामीण मतदार संघातील गावागावात, वाडीवस्तीतील विविध गावच्या विकासासाठी कोट्यावधी रूपयाचा निधी मंजूर करून आणला. अनेक कामांना मंजूरी मिळवून घेतली. त्यातील अनेक कामे पूर्ण झाली आहेत, तर काही कामे प्रगतीपथावर आहेत हे खुप दिलासादायक आहे. मतदार संघातील गावागावात, वाडीवस्तीत आ. रमेशअप्पा कराड यांच्या माध्यमातून विविध मंदिरासमोर बांधण्यात आलेले सभागृह गावकऱ्यांना लक्षवेधी ठरत आहेत. लातूर ग्रामीण मतदारसंघ हेच माझे कुटुंब या भावनेतून काम करत असताना रमेशअप्पांनी जनहिताच्या विकास योजना मंजूर करताना गावागावात, वाडीवस्तीत कसल्याही प्रकारचा भेदभाव केला नाही. वैयक्तिक लाभाच्या योजना संपूर्ण मतदार संघात मोठ्या प्रमाणात गरजु लाभार्थ्यांना मिळवूण दिल्या मदत केली. या सर्व योजना राबवत असताना जात, धर्म, पंथ, गटतट असा भेदभाव केला नाही यातून ''वसुधैव कुटुंबकम्'' याचा प्रत्यय दिसून आला.

आध्यात्मिक, सामाजिक, शैक्षणिक कार्यासह राजकारणात सतत अग्रेसर राहून आपल्या कामाचा वेगळा ठसा निर्माण करणारे, गोरगरीब सर्व सामान्यांच्या हितासाठी संघर्ष करणारे, राजकारण आणि त्यातून मिळालेली पदे स्वताःसाठी नव्हे तर समाजाला उभे करण्यासाठी, अडचणीत, संकटात सापडलेल्यांना मदत करण्यासाठी आहेत. याची जाण आणि भान ठेवून भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी समाजसेवेचे ओझे अखंडपणे वाहून नेत आहेत. त्यांचा आज ३० मे रोजी जन्मदिवस या निमित्ताने मनःपूर्वक शुभेच्छा. आप्पासाहेबांना निरोगी दीर्घायुष्य लाभो त्यांच्या हातून जनसेवेचे कार्य कायम पणे अखंड घडत राहो हीच आदिशक्ती श्री रेणुका मातेच्या चरणी प्रार्थना......!!!

**चंद्रकांत सुर्यकांत कातळे**
**भारतीय जनता पार्टी, रेणापूर.**

## विविध वृत्त...

### प्रेमप्रकरणातून तरुणाने संपवलं जीवन!; आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या महिलेविरुद्ध गुन्हा

**पुणे/प्रतिनिधी** : प्रेमप्रकरणातून तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घोरपडे पेठेत घडली. तरुणाला त्रास देऊन आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपावरुन एका महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. घोरपडे परिसरातील एकबोटे कॉलनीत राहत्य घरात एका २४ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्म हत्या केल्याची घटना नुकतीच घडली होती. तरुणाला आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या एका ३० वर्षीय म हिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महिला मुळची रायगड जिल्ह्यातील महाडची आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तरुणाचे आरोपी महिलेशी प्रेमसंबंध होते. दोघांमधील प्रेमप्रकरणाची कुणकुण नातेवाईकांना लागल्याने त्यांच्यात वाद झाले. त्यानंतर आरोपी महिला आणि तरुणाने एकमेकांशी बोलू नये, तसेच यापुढील काळात कोणतेही संबंध ठेवू नये, असे नातेवाईकांच्या बैठकीत ठरले. त्यानंतर आरोपी महिलेने पुन्हा त्याला त्रास देण्यास सुरुवात केली.

महिलेच्या त्रासामुळे तरुणाने घोरपडे पेठेतील राहत्या घरात नुकतीच आत्महत्या केली. महिलेच्या त्रासामुळे भावाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची फिर्याद तरुणाच्या बहिणीने दिली. त्यानंतर या प्रकरणी महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक ताळीकोटे तपास करत आहेत.

### उकाड्यापासून दिलासा मिळणार; राज्यात पुढील दोन दिवस बहुतांश जिल्ह्यात वादळी पावसाचा प्रभाव

**मुंबई/प्रतिनिधी** : मागील काही दिवसांपासून राज्यातील काही भागात कमाल तापमानात चढ उत्तर होत आहे. तर काही जिल्यात वादळी पावसाने काहीसा दिलासा मिळत असला तरीही राज्यातील उर्वरित प्रदेशात उकाडा कायम आहे. यामुळे नागरिकांचे लक्ष सध्या मान्सूनच्या वाटचालीकडे लागले आहे. दरम्यान, उत्तरेच्या काही राज्यांमध्ये सध्या पश्चिमी विक्षोभामुळे (वादळामुळे) वादळी पावसाची नोंद होत आहे. महाराष्ट्रातही मान्सूनपूर्व घडामोडींना वेग आला असून पुढील दोन ते तीन दिवसात राज्यातील बहुतांश जिल्ह्यात वादळी पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

राज्यात यंदा मे महिना अधिक तापदायक ठरत आहे. विदर्भात मागील काही दिवसांपासून तीव्र उष्णेतची लाटेसदृश्य स्थिती नोंदली जात होती. त्याम ुळे तापमानाचा पारा ४४ ते ४६ अशांवर पोहोचला होता. दरम्यान, शुक्रवारपासून विदर्भातील बहुतांश प्रदेशात वादळी पावसाची स्थिती असणार आहे. त्यामुळे कमाल तापमानात घट होऊन नागरिकांना तीव्र उष्णतेपासून काहीसा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

मध्य महाराष्ट्रात वादळी पावसाची आणि म राठवाड्यातील काही भागात वादळी पावसासह गारपीटीचीही नोंद होत आहे. यामुळे येथील कमाल तापमानही मागील काही दिवसांच्या तुलनेत घट झाली आहे. दरम्यान, शुक्रवारी या प्रदेशात हलक्या सरींची शक्यता वर्तवण्यात आली आहे.मागील दोन तीन दिवसांपासून कोकण प्रदेशात उन्हाचा तडाखा जाणवत आहे. कमाल तापमान स्थिर असले तरीही उकाडा लक्षणीय वाढला आहे.दरम्यान, राज्यातील कमाल तापमानात पुढील दोन दिवसात २ ते ३ अंशांनी घट होईल अशी शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

वादळी पावसाचा प्रभाव कुठे वाढणार ?

शुक्रवारी मुख्यत: विदर्भातील काही भागात वादळी पावसाचा प्रभाव असेल तर उर्वरित राज्यातील तुरळक भागात हलक्या सरींची शक्यात आहे. तर शनिवारी मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि कोकण प्रदेशातील काही भागात हलक्या सरींची शक्यता आहे तर विदर्भाला पावसाचा 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे. दरम्यान, रविवारी पावसाचा प्रभाव वाढून मध्य महाराष्ट्र , मराठवाड्यातील काही तर संपूर्ण विदर्भातील जिल्ह्यांना हवामान विभागाकडून 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे. बुलढाणा, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, गोंदिया आणि गडचिरोली आदी भागांना हवामान विभागाकडून शुक्रवारी 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे तसेच सिंधुदुर्ग, रत्नागिरी, कोल्हापूर आणि कोल्हापूर घाट विभाग, सांगली, सोलापूर, लातूर, परभणी, हिंगोली आणि नांदेड आदी भागात हलक्या सरींची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे तर उर्वरित राज्यात कोरडे हवामान असेल असा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे.

### १६ वर्षांनंतर पहिल्यांदाच असं घडलं! पदार्पणात नंदिनी शर्माने घडवला इतिहास

नवी दिल्ली : येत्या काही दिवसात आयसीसी महिला टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेचा थरार सुरू होणार आहे. ही स्पर्धा इंग्लंडमध्ये खेळवली जाणार आहे. ही स्पर्धा सुरू होण्याआधी भारत आणि इंग्लंड महिला संघांमध्ये ३ टी-२० सामन्यांची मालिका सुरू आहे. या सामन्यात भारतीय संघाकडून नंदिनी शर्माला पदार्पण करण्याची संधी देण्यात आली होती. तिने पदार्पणाच्या सामन्यात दमदार गोलंदाजी केली आणि भारतीय संघाला विजय मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावली. यादरम्यान तिने १६ वर्षापूर्वीचा मोठा रेकॉर्ड मोडून काढला आहे. भारतीय संघ काही दिवसात टी-२० वर्ल्डकप खेळण्यासाठी मैदानात उतरणार आहे. त्यामुळे इंग्लंडविरुद्ध सुरू असलेली टी-२० मालिका ही भारतीय संघासाठी रंगीत तालीम आहे. पहिल्याच सामन्यात भारतीय खेळाडूंकडून दमदार खेळ पाहायला मिळाला. हा सामना भारतीय संघाने ३८ धावांनी जिंकून मालिकेत १-० ने आघाडी घेतली आहे. इंग्लंडमध्ये पदार्पण करण्याची संधी मिळालेल्या नंदिनी शर्माने या संधीचा पुरेपूर फायदा घेत ३४ धावा देत इंग्लंडच्या ३ फलंदाजांना माघारी धाडलं. ही कुठल्याही भारतीय गोलंदाजाने हा सामन्यात केलेली सर्वोत्तम कामगिरी ठरली.

# सिंगल विंडो क्लिअरन्स व्यवस्थेमुळे लाईव्ह इव्हेंट्स संदर्भातील परवानगी प्रक्रिया गतिमान होणार

## प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील लाईव्ह इव्हेंट, कॉन्सर्ट, सांस्कृतिक कार्यक्रम आणि महोत्सवांच्या आयोजनासाठी कमी कालावधीत आणि सुलभरित्या परवानग्या मिळण्यासाठी सिंगल विंडो क्लिअरन्स' प्रणाली माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत विकसित करण्यात येत आहे. या प्रणालीमुळे लाईव्ह इव्हेंट क्षेत्राच्या कार्यप्रणाली प्रक्रिया निश्चित गतिमान होणार आहे, असा विश्वास माहिती जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी व्यक्त केला.

मंत्रालयातील परिषद सभागृहात लाईव्ह इव्हेंटस क्षेत्रातील विविध संस्था प्रतिनिधींसमवेत आयोजित बैठकीत प्रधान सचिव तथा महासंचालक सिंह बोलत होते.

या बैठकीस सामान्य प्रशासन विभागाच्या उपसचिव समृद्धी अनगोळकर, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक (प्रशासन) किशोर गांगुर्डे, संचालक (माहिती) गोविंद अहंकारी तसेच लाईव्ह इव्हेंट आयोजित करणाऱ्या संस्थांचे प्रतिनिधी ईव्हीए लाईव्हचे संचालक विनोद जनार्धन, लक्ष मिडिया ग्रुपचे सिईओ शाजू इग्नाथस, मिडास नेक्स्ट मिडियाचे संस्थापक व महाव्यवस्थापक दीपक पवार, ईईएमएचे सचिव अंकुर कालरा, बीएमएस लाइव्हचे उप महाव्यवस्थापक स्वप्नील माने, थिएटर प्रोड्यूसर अश्विन गिडवाणी,



यूनडीपी इंडियाच्या संचालिका कविता सचवानी, साहिल कुलंगरा, हर्षल कोठारी आदी उपस्थित होते.

प्रधान सचिव ब्रिजेश सिंह म्हणाले की, राज्यातील लाईव्ह इव्हेंट क्षेत्राची आर्थिक, सांस्कृतिक आणि पर्यटनविषयक प्रचंड क्षमता आहे. या क्षेत्राच्या विकासासाठी शासन सकारात्मक भूमिका घेत आहे. सध्या कार्यक्रम आयोजनासाठी विविध विभागांकडून स्वतंत्र परवानग्या घ्याव्या लागत असल्याने आयोजकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. शिवाय यामध्ये बराच कालवधी लागतो. या प्रक्रियेत सुसूत्रता आणण्यासाठी आणि कालबद्ध पद्धतीने परवानग्या उपलब्ध करून देण्यासाठी सिंगल विंडो प्रणाली विकसित करण्यात येत आहे. महाराष्ट्रासाठी लाईव्ह इव्हेंट्सच्या परवानगी घेण्यासाठी प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) तयार करण्यात येणार असून, याधारे लाईव्ह इव्हेंट्चे कार्यक्रम आयोजन करणाऱ्यांना सर्व आवश्यक परवानग्या एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे.

लाईव्ह इव्हेंट उद्योगासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्यासाठी शैक्षणिक संस्था, उद्योग क्षेत्र आणि शासन यांच्यात समन्वय करण्यात येणार आहे. कौशल्य विकास, विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आणि युवकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करण्यासाठी संयुक्त प्रयत्न करण्यात येणार आहेत. उद्योग क्षेत्राकडून प्राप्त झालेल्या सूचना आणि शिफारशींचा विचार करून महाराष्ट्रासाठी प्रभावी, पारदर्शक आणि उद्योगपूरक कार्यपद्धती विकसित करताना प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्यावर भर असेल. लाईव्ह इव्हेंट क्षेत्राला चालना मिळण्याबरोबरच पर्यटन, गुंतवणूक, रोजगारनिर्मिती आणि राज्याच्या अर्थव्यवस्थेलाही बळकटी मिळेल, असा विश्वास प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी व्यक्त केला.

प्रधान सचिव ब्रिजेश सिंह म्हणाले की, लाईव्ह इव्हेंट क्षेत्राशी संबंधित विविध अडचणी दूर करून या उद्योगाला अधिक सक्षम, सुलभ आणि स्पर्धात्मक वातावरण उपलब्ध करून देणे हा शासनाचा प्रमुख उद्देश आहे. यासाठी परवानगी प्रक्रियेत सुसूत्रता आणून ती अधिक पारदर्शक, कालबद्ध आणि उद्योगपूरक करण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे राज्यातील मनोरंजन उद्योगाला चालना मिळण्याबरोबरच पर्यटन, गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीच्या संधींमध्येही वाढ होईल. तसेच महाराष्ट्राला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील मोठ्या कार्यक्रमांसाठी आकर्षक केंद्र म्हणून विकसित करण्यास मदत होईल, असेही ब्रिजेश सिंह यांनी यावेळी सांगितले.

या बैठकीत उद्योग प्रतिनिधींनी परवानगी प्रक्रियेतील अडचणी, विविध विभागांमधील समन्वय, गर्दी व्यवस्थापन, वाहतूक नियोजन, सुरक्षा मानके, पर्यावरणपूरक कार्यक्रमांचे आयोजन, कौशल्य विकास आणि तंत्रज्ञानाचा वापर यांसंदर्भात विविध सूचना मांडल्या. बैठकीत महाराष्ट्रातील सांस्कृतिक, संगीत, खाद्य आणि पर्यटन महोत्सवांना राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रोत्साहन देण्यासाठी प्रभावी ब्रँडिंग, प्रायोजकत्व, महसूल निर्मिती आणि खासगी क्षेत्राच्या सहभागाबाबतही चर्चा झाली. पर्यावरणपूरक 'ग्रीन इव्हेंट्स', कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक वाहतुकीचा वापर आणि कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी उद्योग क्षेत्राने केलेल्या उपक्रमांची माहितीही यावेळी देण्यात आली.

## हिशोब चुकता करण्याची तयारी! त्या दगाफटक्यानंतर शिंदे गटाचा भाजपविरोधात गेमप्लॅन, महायुतीच्या विजयाचं गणित फिस्कटणार?

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात आगामी विधान परिषद निवडणुकीचे बिगुल वाजले असतानाच, सत्ताधारी महायुतीम ध्ये अंतर्गत धुसफूस आणि फाटाफुटीचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. वरिष्ठ पातळीवर जरी ही निवडणूक महायुती म्हणून एकत्र लढवण्याचा दावा केला जात असला, तरी जिल्हा पातळीवर मात्र भाजप आणि मित्रपक्षांमधील दरी कमालीची रुंदावली आहे. नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद निवडणुकांम ध्ये भाजपने केलेल्या दगाफटक्यामुळे स्थानिक शिवसेना नेते, नगरसेवक आणि पदाधिकारी अजूनही प्रचंड संतापलेले असून, त्याची मोठी किंमत भाजपला विधान परिषदेत मोजावी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सातारा, सांगली, सोलापूर, नाशिक, जळगाव, छत्रपती संभाजीनगर आणि रायगड या महत्त्वाच्या जिल्ह्यांमध्ये जिल्हा परिषद निवडणुकीदरम्यान सत्ताधारी भाजप विरुद्ध शिवसेना असा थेट संघर्ष पाहायला मिळाला होता. साताऱ्यात तर चक्क राज्याचे मंत्री आणि शिवसेना शिंदे गटाचे नेते शंभूराज देसाई आणि राष्ट्रवादीचे मंत्री मकरंद आबा पाटील यांना झालेल्या धक्काबुकीचे तीव्र पडसाद थेट विधिमंडळात उमटले होते. या स्थानिक पातळीवरील निवडणुकांनी केलेल्या जखमा अजूनही ताज्या असून, स्थानिक स्वराज्य संस्थांचे मतदार आता विधान परिषदेच्या निवडणुकीत भाजपवर थेट उट्टे काढण्याच्या तयारीत आहेत. शिवसेना नेत्यांकडून सध्या जिल्हा पातळीवर आढावा बैठकांचे सत्र सुरू आहे. या बैठकांमध्ये स्थानिक नेत्यांनी आणि आमदारांनी भाजपविरोधात उघडपणे नाराजी नोंदवली आहे. सोलापूर येथील शिवसेनेच्या कोअर कमिटीच्या बैठकीत तर भाजपचे पालकमंत्री मित्रपक्षांना सोबत घेऊन चालत नसल्याची आणि अनेक महत्त्वाच्या निर्णयांमध्ये त्यांना सर्रास डावलले जात असल्याची थेट खंत बोलून दाखवण्यात आली.

अनेक जिल्ह्यांतील शिवसेना पदाधिकाऱ्यांनी वरिष्ठ नेत्यांकडे आक्रमक भूमिका मांडत, काही ठिकाणी स्वतंत्र लढण्याचा किंवा भाजपला सोडून स्थानिक पातळीवर इतर पक्षांशी छुपी युती करण्याचा सल्लाही दिला आहे.

अनेक जिल्ह्यांमध्ये जर शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांनी स्थानिक पातळीवर महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार पक्ष) किंवा इतर प्रादेशिक पक्षांशी हातमिळवणी केली, तर भाजपला विधान परिषदेच्या अनेक जागांवर थेट आणि मोठा फटका बसू शकतो.

या वाढत्या असंतोषामुळे म हायुतीचे गणित बिघडू नये, यासाठी शिवसेनेच्या गोटात तातडीने हालचाली सुरू झाल्या आहेत. शिवसेनेचे वरिष्ठ मंत्री लवकरच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली भाजपच्या वरिष्ठ नेत्यांशी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करणार आहेत. महायुतीमध्ये योग्य समन्वय राहावा आणि भाजप नेत्यांनी मित्रपक्षांना सन्मानाची वागणूक द्यावी, अशा सूचना करण्याची मागणी या बैठकीत केली जाणार आहे. दुसरीकडे, शिवसेनेच्या पक्षश्रेष्ठींनी प्रत्येक जिल्ह्यात आमदार आणि नगरसेवकांच्या तातडीच्या बैठका घेत स्थानिक पातळीवरील नाराजी दूर करण्यासाठी 'डॅमेज कंट्रोल' सुरू केले आहे. मात्र, तळागाळातील कार्यकर्त्यांमध्ये असणारी ही खदखद आगामी निवडणुकीत महायुतीला किती महाग पडणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

## नाशिक टीसीएस प्रकरण: ८ संशयितांविरुद्ध २ हजार पानांचे दोषारोपपत्र दाखल!

**नाशिक/प्रतिनिधी** : टीसीएस बहुराष्ट्रीय कंपनीत कामाच्या ठिकाणी महिलांचा विनयभंग, लैंगिक अत्याचार, धर्मातराचा प्रयत्न आणि धार्मिक भावना दुखावल्या प्रकरणी दाखल आठ गुन्ह्यांत आठ संशयितांविरुद्ध दोन हजारहून अधिक पानांचे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले आहे. संशयितांमध्ये सहा पुरूष तर दोन महिलांचा समावेश आहे. प्रत्येक गुन्ह्यासाठी स्वतंत्र दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

टीसीएसमधील प्राप्त विविध तक्रारींवरून आठ जणांविरोधात एकूण नऊ गुन्हे दाखल आहेत. यातील लैंगिक अत्याचार व धर्मातराचा प्रयत्न प्रकरणी एक गुन्हा देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात तर उर्वरित आठ गुन्हे मुंबई नाका पोलीस ठाण्यात दाखल आहेत. यात रजा रफीक मेमन, शाहरूख हुसेन शौकत कुरेशी, अश्विनी चैनानी, तौसीफ बिलाल अत्तार, शफी भिकन शेख, दानिश इजाज शेख, निदा एजाज खान, आसिफ आलम अन्सारी या संशयितांचा समावेश आहे. आठ गुन्ह्यांतील या संशयितांविरुद्ध येथील मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात मूळ दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. प्रत्येक गुन्ह्याचे स्वतंत्रपणे दोषारोपपत्र आहे. या सर्वाचा विचार करता ते दोन हजारहून अधिक पानांचे असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले.

तपासादरम्यान पोलिसांनी सुमारे ५० साक्षीदारांचे जबाब नोंदविले. सीसी टीव्ही चित्रण, तांत्रिक व डिजिटल पुरावे, गुन्ह्यात वापरलेल्या वस्तू आदींचा समावेश आहे. दाखल गुन्ह्यांच्या तपासात प्राप्त झालेल्या साक्षी पुराव्यांवरून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल झाले असले तरी या गुन्ह्यांचा तपास सुरूच राहणार आहे. अधिकचे पुरावे प्राप्त करून न्यायालयात पुरवणी दोषारोपपत्रही दाखल करण्यात येणार आहे. या सर्व गुन्ह्यातील संशयितांचे जामीन न्यायालयाने फेटाळले आहेत. टीसीएस कंपनीतील लैंगिक अत्याचार, धर्मातराचा प्रयत्न प्रकरणी दाखल पहिल्या गुन्ह्यात दानिश शेख, तौसिफ अत्तार, निदा खान आणि मतिन पटेल यांच्याविरुद्ध दीड हजार पानांचे दोषारोपपत्र नाशिकरोड येथील अतिरिक्त सत्र व विशेष न्यायालयात यापूर्वीच दाखल करण्यात आले आहे.

टीसीएस प्रकरणाचा तपास विशेष तपास पथक करीत आहे. या गुन्ह्यातील संशयित निदा खानने ४० दिवसांहून अधिक काळ पोलिसांना गुंगारा दिला होता. छत्रपती संभाजीनगर येथून तिला ताब्यात घेण्यात आले. या गुन्ह्यात १७ साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले. तपासात पीडिता व संशयितांचे भ्रमणध्वनी व्हॉट्स अप संभाषणाचे स्क्रिन शॉट आणि फोटो असे तांत्रिक व डिजिटल पुरावे जमा करण्यात आले.

# सुजितसिंह ठाकूर लय मोठ्या ताकदीचा नेता, गृहमंत्री अमित शाह शेवटच्या काही मिनिटात उमेदवारी जाहीर करू शकतात

धाराशिव बीड लातूर स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीसाठी प्रदेश भाजपने काही नावे केंद्राकडे पाठवली असली तरी, भाजपा नेते सुजितसिंह ठाकूर वजनदार व मोठ्या ताकदीचा नेता आहे. अंतिम चर्चेदरम्यान शेवटच्या काही मिनिटात देशाचे गृहमंत्री अमित शाह, ठाकूर यांची उमेदवारी जाहीर करू शकतात असा कयास बांधला जात आहे.

राज्यात सध्या १७ स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद मतदार संघामध्ये निवडणूकीचा धुरळा उडला आहे. अशातच काल महायुतीचे जागावाटप ठरल्याची माहिती समोर येत आहे. भाजपकडे १२ जागा, शिंदे शिवसेनेकडे ०३ जागा व राष्ट्रवादी अजित पवार गटाकडे ०२ जागा असा फॉर्मुला दिल्ली दरबारी मंजूर केल्याचे चित्र स्पष्ट झाले. भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश नेतृत्वाने राज्यातील भाजप उमेदवारांची यादी केंद्रीय नेतृत्वाकडे सोपविली आहे.यात मराठवाड्यातील धाराशिव बीड लातूर या अतिशय महत्त्वाच्या विधान परिषद मतदार संघामध्ये भाजपचे पक्ष संघटनेतील महत्त्वाचे नेते माजी आमदार सुजितसिंह



ठाकूर यांची कार्यशैली, पक्षातील अनुभव पाहता मराठवाड्यातील विविध भागातून पक्षाचे पदाधिकारी तसेच कार्यकर्त्यांकडून ठाकूर यांचे नाव अग्रस्थानी घेतले जात आहे. तसेच धाराशिव जिल्ह्यातील भूम परंडा वाशी मतदारसंघातील मुख्य पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच सामान्य जनता ही सुजितसिंह ठाकूर सारख्या प्रभावी व कर्तव्यदक्ष नेत्याला मराठवाड्याच्या विकासासाठी भाजप पक्ष उमेदवार म्हणून संधी देईल अशी आशा बाळगून आहे. संबंधित विषय हा केवळ निवडणुकीपुरता मर्यादित नसून मराठवाड्यातील सदरच्या जिल्ह्यांमध्ये मागील काही दशकांमध्ये भाजपा पक्षाची अवस्था बिकट होती तेव्हा सुजितसिंह ठाकूर यांनी विद्यार्थीदशेत असल्यापासून पक्षाचा झेंडा हाती घेतला केवळ मराठवाडाच नव्हे तर राज्यभर सक्रिय कार्यकर्त्यांची मोट बांधली. ज्यावेळेस राज्यांमध्ये काँग्रेस राष्ट्रवादीचे सरकार होते तेव्हा भाजप पक्षासाठी काम करणे खूप मोठे जिकीरीचे होते. तसेच जेव्हा १९९९ साली युतीचे सरकार आले त्यावेळेस भाजपचे दिवंगत नेते उपमुख्यमंत्री गोपीनाथजी मुंडे यांच्या समवेत मराठवाड्यासह अख्खा महाराष्ट्र सुजितसिंह ठाकूर यांनी पिंजून काढला होता. मराठवाड्याच्या ग्रामीण भागामध्ये वाड्या वस्त्या वरती भाजप पक्षाचे संघटन वाढीसाठी ठाकूर यांनी श्रम घेतले. धाराशिव जिल्हा युवा मोर्चाचे अध्यक्ष ते भाजपा युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष असा झंझावाती राजकीय प्रवास सुजितसिंह ठाकूर यांचा झालेला आहे. मागील २०१४ साली फडणवीस सरकारच्या काळामध्ये प्रदेश सरचिटणीस सारख्या पदावरती महत्त्वाची भूमिका निभावली असून विधान परिषदेचे आमदार असताना राज्याच्या सभागृहामध्ये मराठवाड्याच्या हक्कासाठी पाणी प्रश्न व कृषीधोरण, रेल्वे मार्ग मंजुरी, औद्योगीकरण संदर्भातील रोखठोक भाषणे मराठवाड्यातील जनता विसरलेली नाही. दिवंगत लोकनेते उपमुख्यमंत्री गोपीनाथ मुंडे यांच्या समवेतची संघर्ष यात्रा असो की मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या समवेत ची महाजनादेश यात्रा असो सुजितसिंह ठाकुर यांचेकडे संयोजन आणि नियोजनाची जबाबदारी होती हे विसरून चालता येणार नाही. शिवाय देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी,गृहमंत्री अमित शाह यांच्या धाराशिव तुळजापूर दौऱ्याचे संपूर्ण नियोजन ठाकूर यांनी अनेक वेळा यशस्वीरित्या केले आहे. तसेच २०१७/ १८ साली केंद्रीय नेतृत्वाने त्यांच्यावरती आंध्र प्रदेश व तेलंगणा प्रदेशाचे भाजपा प्रचार प्रमुख म्हणून जबाबदारी सोपवली होती त्यांनी केलेली कामगिरी उल्लेखनीय आहे.

युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष असो की भाजपा प्रदेश सरचिटणीस म्हणून केलेले कार्य असो त्याचबरोबर विधान परिषदेचे आमदार म्हणून धाराशिव जिल्ह्यातील भूम परंडा वाशी या मतदारसंघातील जनतेची केलेली विविध कामे असो या सर्व बाबींचा अनुभव पाहता, पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांबरोबर जनता जनार्दन ही चर्चा करतेय , सुजित सिंह ठाकुर लय मोठ्या ताकदीचा नेता आहे, कार्य,कर्तुत्व,संघटनशैली,शिस्त, अभ्यासपूर्ण मांडणी, विविध भाषेवरती असलेले प्रभुत्व, धारदार खणखणीत आवाजाची समाज मनावर सोडलेली छाप, माणसातला माणूस म्हणजेच सुजित सिंह ठाकूर आहेत. सुजितसिंह ठाकुर यांच्यासारख्या राजकारणातील अष्टपैलू, सर्वगुणसंपन्न , प्रभावी सक्षम नेतृत्वाचे नाव अंतिम चर्चेदरम्यान गृहमंत्री अमित शाह शेवटच्या काही मिनिटात जाहीर करू शकतात असे राजकीय जाणकारांचे मत आहे.

**नितीन जाधव. मंत्रालय मुख्य संपर्क प्रमुख/ राजकीय सल्लागार.**
**महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ.मुंबई**

# आयटी कंपन्यांमध्ये नोकरी मिळालेल्या १२६ विद्यार्थ्यांचा कॉक्सिटमध्ये सत्कार



**लातूर/प्रतिनिधी :** येथील कॉक्सिट महाविद्यालयात विविध बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये (आयटी) कॅम्पसमुलाखतीतून मोठ्या पॅकेजची नोकरी मिळालेल्या १२६ विद्यार्थी व पालकांचा गौरव सोहळा माजीमंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आला.

येथील कॉक्सिटच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजीमंत्री संजय बनसोडे, संस्थचे उपाध्यक्ष एल. एम. पाटील,संस्थेचे नागोराव पाटील, जिल्हा परिषदेचे आरोग्य व बांधकाम सभापती ज्ञानेश्वर बिरादार, जळकोटचे नगराध्यक्ष मन्मथप्पा किडे, विशेष कर्तव्य अधिकारी डॉ. ई. यू. मासूमदार, कॉक्सिटचे प्राचार्य डॉ. आर. एस. अवस्थी उपप्राचार्य डॉ. एन. एस. झुल्पे, तज्ज्ञ संचालक एन. डी. जगताप, डॉ. व्ही. व्ही. भोसले, ट्रेनिंग व प्लेसमेंट प्रमुख प्रा. कैलास जाधव, प्रबंधक संतोष कांबळे, प्रा. जितेंद्र बनसोडे उपस्थित होते.

आ. बनसोडे म्हणाले,ग्रामीण विद्यार्थ्यांनी बहुराष्ट्रीय आयटी कंपन्यांमध्ये मिळविलेले स्थान हे कौतुकास्पद आहे. त्यांनी या संधीचे सोने करून देशाच्या प्रगतीत आपले योगदान द्यावे, असे सांगून कॉक्सिटने मागील अनेक वर्षांपासून ग्रामीण विद्यार्थ्यांच्या आयुष्यात संगणकशास्त्राच्या रुपाने ज्ञानाचा दिवा लावण्याचा प्रयत्न केला आहे. यातूनच एकाच वर्षात तब्बल १२६ विद्यार्थ्यांना नामांकित आयटी कंपन्यांमध्ये मोठ्या पॅकेतजच्या नोकऱ्या मिळाल्या आहेत. डॉ. एम. आर. पाटील यांच्या मार्गदर्शनात सर्व प्राध्यापकांनी घेतलेल्या परिश्रमाचे हे चीज आहे, असे ते म्हणाले.

अध्यक्षीय समरोपात डॉ. एम. आर. पाटील म्हणाले, बहुराष्ट्रीय आयटी कंपन्यांमध्ये निवड होण्यासाठी सलग तीन वर्षे महाविद्यालयाच्यावतीने तयारी करून घेण्यात आली. कंपन्यांना हवे असलेलाच अभ्यासक्रम कॉक्सिटमध्ये शिकविला जातो. त्याचेच फलित म्हणजे म्हणून १२६ विद्यार्थ्यांच्या निवडी झाल्या आहेत. विद्यार्थ्यांनी मिळविलेले हे यश त्यांच्या मेहनतीचे फळ आहे, विद्यार्थ्यांनी कॉर्पोरेट जगतात संस्थेचे नाव उज्वल करण्याचे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ट्रेनिंग व प्लेसमेंट प्रमुख प्रा. कैलास जाधव यांनी केले. प्राचार्य डॉ. आर. एस. अवस्थी यांनी कॉक्सिटने घेतलेल्या मेहनतीचे फळ म्हणजे एकाचवेळी १२६ विद्यार्थ्यांना नोकऱ्या मिळाल्याचे ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुषमा मुंडे यांनी केले.

अद्यापही विप्रो या कंपनीच्या वतीने घेण्यात आलेल्या कॅम्पस मुलाखतीत निवड झालेल्या सुमारे ६०० विद्यार्थ्यांच्या निवडी जाहीर होणार असल्याचे महाविद्यालयाच्यावतीने सांगण्यात आले.

## आचारसंहितेमुळे १ जून रोजीचा जिल्हास्तरीय लोकशाही दिन स्थगित

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यात दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजित करण्यात येणारा जिल्हास्तरीय लोकशाही दिन स्थगित करण्यात आला आहे. सद्यस्थितीत महाराष्ट्र विधान परिषदेच्या उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूक-२०२६ ची आदर्श आचारसंहिता लागू आहे. या आचारसंहितेच्या अंमलबजावणीमुळे आगामी सोमवार, १ जून २०२६ रोजी जिल्हास्तरीय लोकशाही दिन आयोजित केला जाणार नाही, अशी माहिती लातूरचे प्रभारी उपजिल्हाधिकारी (सामान्य) गणेश पवार यांनी दिली आहे.

## जात प्रमाणपत्र मिळण्यात अडचणी आल्यास हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासन अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० आणि विविध शासन निर्णयामधील तरतुदींनुसार पात्र व्यक्तींना जात प्रमाणपत्र निर्गमित करण्याची तरतूद आहे. या अनुषंगाने लातूर जिल्ह्यात लातूर, औसा-रेणापूर, निलंगा, अहमदपूर आणि उदगीर अशा पाच उपविभागीय अधिकारी कार्यालयांतर्गत जात प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात येते.

नागरिकांनी जात प्रमाणपत्र मिळण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे. तसेच जात प्रमाणपत्र ऑनलाईन पोर्टलवरून काढताना काही अडचणी किंवा समस्या येत असल्यास, अथवा कोणतीही फसवणूक होत असल्यास नागरिकांनी त्याबाबतची तक्रार प्रशासनाच्या ०२३८२-२२०२०० या दूरध्वनी क्रमांकावर करावी, असे लातूर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत प्रसिद्ध पत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

## विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांनी बेनिफिशरी सत्यापन ॲपद्वारे डिजीटल हयात प्रमाणपत्र सादर करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या ७ मे, २०२६ च्या शासन निर्णयानुसार, विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांसाठी आता हयात प्रमाणपत्र (डिजीटल लाईफ सर्टिफिकेट) ऑनलाईन सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. लातूर तालुक्यातील संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना तसेच इतर सर्व विशेष सहाय्य योजनांच्या सर्व लाभार्थ्यांनी आपले डिजीटल हयात प्रमाणपत्र विहित पद्धतीने सादर करावे, असे आवाहन लातूर तहसील कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

**मोबाईल किंवा सेतू केंद्रावरून सुविधा उपलब्ध**

लाभार्थ्यांना हे प्रमाणपत्र सादर करणे सोपे जावे यासाठी बेनिफिशरी सत्यापन ॲप विकसित करण्यात आले आहे. लाभार्थी हे प्रमाणपत्र स्वतःच्या किंवा आपल्या नातेवाईकांच्या मोबाईलवरून या ॲपचा वापर करून सादर करू शकतात. तसेच ज्यांना मोबाईलवर ही प्रक्रिया करणे शक्य नाही, त्यांनी जवळच्या सेतू सुविधा केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र किंवा नागरी सेवा केंद्राला भेट देऊन आपले डिजीटल हयात प्रमाणपत्र काढून घ्यावे.

ग्रामीण व दुर्गम भागातील अनेक लाभार्थ्यांना ही ऑनलाईन प्रक्रिया स्वतः करणे शक्य नसते. अशा वेळी लाभार्थ्यांनी आपल्या नातेवाईकांची मदत घ्यावी अथवा जवळच्या सेतू सुविधा केंद्राचा लाभ घेऊन ही प्रक्रिया पूर्ण करावी. जेणेकरून लाभार्थ्यांचे अनुदान विनाअडथळा सुरू राहण्यास मदत होईल, असे आवाहन लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

## भारताच्या प्रसिद्ध शेफला स्तनाचा कर्करोग, हॉस्पिटलमधील फोटो व्हायरल, चाहत्यांना केलं आवाहन

**मुंबई/प्रतिनिधी :** मास्टर शेफ सीझन १ची विजेता पंकज भदौरिया यांच्यासंबंधित एक मोठी आणि धक्कादायक बातमी समोर येत आहे. पंकज भदौरिया यांना स्तनाच्या कर्करोगाचे निदान झालं आहे. त्यांनी या संबंधित सोशल मीडियात एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी चाहत्यांसोबत ही माहिती शेअर केली. यावेळी आपल्या चाहत्यांना महत्त्वाची माहिती देत आवाहन केलं आहे. २८ मे रोजी पंकज भदौरिया यांनी इन्स्टाग्रामवर एक शॉकिंग पोस्ट शेअर केली आहे. शेअर केलेल्या फोटोमध्ये पंकज या बेडवर रेस्ट करत असल्याचं दिसून येत आहे. त्यांच्या चेहऱ्यावर एक लहान स्माईल दिसत आहे. त्यांनी आपल्या पोस्टमध्ये ब्रेस्ट कॅन्सरचं निदान झाले असल्याचं सांगितलं. 'मला ब्रेस्ट कॅन्सर आहे. मला तुमच्या प्रार्थना आणि पाठिंब्याची गरज आहे', असं त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. दरम्यान, पंकज भदौरिया नेमकं कॅन्सरच्या कोणत्या स्टेजवर आहेत? हे अद्याप कळू शकलेली नाही. पंकज भदौरिया यांची पोस्ट सध्या सोशल मीडियात व्हायरल होत आहे. पोस्टवर नेटकऱ्यांनी त्यांना पाठिंबा दिला आहे. तसेच धीर देत त्यांच्या उत्तम तब्येतीसाठी प्रार्थना केली आहे. पंकज भदौरिया या सोशल मीडियात सक्रीय असतात. मुख्य म्हणजे त्या दर वर्षी बॉडी चेकअप करतात. १७ मे रोजी त्यांनी एक पोस्ट शेअर केली होती. या पोस्टमध्ये त्यांनी, हेल्थ चेकअपसाठी जात असल्याचं सांगितलं. त्यांनी आपल्या पोस्टमध्ये जनतेला आवाहनही केलं होतं. 'माझ्या मते, जर तुमचे वय ४५ वर्षापेक्षा जास्त असेल तर, तुम्ही दरवर्षी आरोग्य तपासणी करुन घेतली पाहिजे', असं त्यांनी म्हटलं होतं.पंकज भदौरियांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटलं होतं की, 'रेगुलर हेल्थ चेकअपमुळे आजार लवकर ओळखायला मदत मिळते. आजार वाढण्यापूर्वी, त्यावर उपचार करता येतात. यामुळे मानसिक शांतीही मिळते. लक्षणांची वाट पाहू नका. भविष्यात या टीपसाठी तुम्ही माझे आभार मानाल'. सध्या पंकज भदौरिया यांची पोस्ट सोशल मीडियात व्हायरल होत असून, ते लवकर आजारातून बरे व्हावेत, यासाठी त्यांचे चाहते प्रार्थना करीत आहेत.

## माजी मंत्री प्राजक्त तनपुरे आज भाजपमध्ये प्रवेश करणार

**मुंबई/प्रतिनिधी :** विधानपरिषद निवडणुकीच्या तोंडावर महाविकास आघाडीला अहिल्यानगर जिल्ह्यात मोठा धक्का बसला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खंदे शिलेदार आणि माजी राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे हे अखेर उद्या (शनिवारी, ३० मे) भाजपमध्ये जाहीर प्रवेश करणार आहेत. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश पार पडणार असून, अहिल्यानगर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून तनपुरे यांना भाजपची उमेदवारी मिळण्याची दाट शक्यता सूत्रांनी वर्तवली आहे.राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीतून ऐनवेळी माघार घेतल्यापासूनच प्राजक्त तनपुरे यांच्या राजकीय भूमिकेविषयी तर्कवितर्क लढवले जात होते, त्यावर आता या भाजप प्रवेशामुळे शिक्कामोर्तब झाले आहे. उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम मुदत १ जून असल्याने, उद्याच्या पक्षप्रवेशानंतर पुढील २४ तासांत अहिल्यानगरच्या राजकारणाला अत्यंत अनपेक्षित वळण मिळण्याची चिन्हे आहेत. पोटनिवडणुकीतून माघार घेतल्याचे फळ म्हणून भाजपकडून त्यांना विधानपरिषदेची उमेदवारी दिली जाणार असल्याचे समजते.या सर्व राजकीय घडामोडींमध्ये सर्वाधिक चर्चा रंगली आहे.

## श्री वर्धमान श्वेतांबर जैन श्रावक संघाच्या अध्यक्षपदी सीए सुनील कोचेटा, सचिवपदी राजेश डुंगरवाल यांची बिनविरोध निवड



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील जैन समाजाच्या गावभागातील जुनी व प्रतिष्ठित संस्था असलेल्या श्री वर्धमान श्वेतांबर जैन श्रावक संघाच्या अध्यक्षपदी सीए सुनील कोचेटा तर सचिवपदी राजेश डुंगरवाल यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

संस्थेच्या सर्वसाधारण सभेत नूतन अध्यक्षांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार उपाध्यक्षपदी विनोद छाजेड, सहसचिवपदी हेमंत बोरा, कोषाध्यक्षपदी ॲड. विशाल पोकर्णा तसेच विश्वस्तपदी ऋषभ (राज) दर्डा व विवेक कुचेरिया यांची निवड जाहीर करण्यात आली.

संस्थेमार्फत गुरु गणेश जीवराज जैन गोरक्षण, प्रभाकंवर शिक्षण फंड व प्रकाशधाम यांसारखे विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. नूतन अध्यक्ष सीए सुनील कोचेटा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पहिल्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत समाजबांधवांचा सहभाग वाढविण्यासाठी विविध समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

जैन संत स्व. पू. जीवराजजी महाराजसाहेब यांच्या दीक्षा शताब्दी वर्षानिमित्त विभागीय स्तरावर वक्तृत्व स्पर्धा तसेच पौर्णिमा महोत्सवानिमित्त सामूहिक जप यांसारखे सामाजिक व धार्मिक उपक्रम आयोजित करण्याचे ठरविण्यात आले.

संस्थेच्या कार्याची व्याप्ती वाढावी व कार्याला अधिक गती मिळावी या उद्देशाने सात कायम निमंत्रित सदस्यांची नियुक्ती करण्यास कार्यकारी मंडळाने मंजुरी दिली. तसेच संस्थेच्या विकासात सभासदांचा अधिकाधिक सहभाग वाढावा, युवकांचा धार्मिक व सामाजिक कार्यात सहभाग वाढावा आणि जैन धर्मातील साधू-संतांच्या सेवा व विहार सेवेला प्राधान्य देण्यासाठी सकारात्मक प्रयत्न करण्यात येतील, असा निर्धार नूतन कार्यकारी मंडळाने व्यक्त केला.

बैठकीत सद्गुरू जीवराज भवनाच्या नूतनीकरणासह विविध विकासकामांचाही आढावा घेण्यात आला. चर्चेत नूतन कार्यकारी मंडळाच्या सदस्यांनी उत्साहपूर्ण सहभाग नोंदविला.

शेवटी सचिव राजेश डुंगरवाल यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक जगताप राज्यस्तरीय पुरस्काराणे सन्मानित




**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील लायन्स क्लब ऑफ लातूर सिटी च्या वतीने समाजाच्या विवीध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा यथोचित सन्मान करण्यात आला त्यात जिल्हा पोलिस दलात कार्य करीत असलेले सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक बालाजी जगताप यांचा जिल्हाधिकारी डॉ बास्टेवाड जिल्हा पोलिस अधीक्षक अमोल तांबे, विलास बडे लायन्स क्लबचे नागनाथ गित्ते यांच्या हस्ते बालाजी जगताप व सपत्नीक गौरव करण्यात आला. सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक बालाजी जगताप हे पोलीस दलात असताना अतिशय चांगल कार्य केले तसेच सामाजिक शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे त्यांच्या या पुरस्काराबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

## मनोज जरांगे पाटील उपोषण मागे घेणार, शिष्टमंडळाच्या चर्चेआधीच विखे पाटील असे का म्हणाले?

**मुंबई :** मराठा आरक्षणाच्या प्रलंबित मागण्यांसाठी मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील ३० मे पासून उपोषणाला बसणार आहेत. जरांगे पाटील यांनी आपले हे उपोषण आता टोकाचं उपोषण असल्याचा इशारा दिला आहे. त्यानंतर जरांगे पाटील यांनी आंदोलन करू नये यासाठी शासकीय पातळीवर हालचाली सुरू झाल्या आहेत. मनोज जरांगे पाटील हे उपोषण करणार नसल्याचा विश्वास राज्याचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला आहे. विखे-पाटील यांनी सरकार जरांगे यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक असून उपोषणाची वेळ येणार नाही, असे म्हटले. आज जरांगे पाटील यांच्याशी चर्चा करण्यासाठी मंर्त्यांचे शिष्टमंडळ अंतरवाली सराटी येथे जाणार आहेत. यामध्ये मराठा उपसमिती अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील, उद्योग मंत्री उदय सामंत, भाजप आमदार प्रसाद लाड, आमदार बच्चू कडू यांचे शिष्टमंडळ जरांगे पाटील यांना भेटणार असल्याची माहिती आहे.

## बौद्ध विहारे ही प्रबोधनाची केंद्रे बनली पाहिजेत - डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी





**नांदगाव/प्रतिनिधी :** समाजाच्या प्रगतीसाठी सामाजिक चळवळीची आज नितांत आवश्यकता आहे. विशेषतः युवकांनी व्यसनमुक्त समाज निर्मितीसाठी पुढाकार घेतला पाहिजे. शिक्षण, संघटन आणि सामाजिक बांधिलकी या त्रिसूत्रीच्या माध्यमातून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणता येऊ शकते.यासाठी बौध्द विहारांची भूमिका महत्त्वपूर्ण असून बौध्द विहारे ही प्रबोधनाची केंद्र बनली पाहिजे असे प्रतिपादन युवकनेते डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांनी केले.मौजे नांदगांव येथील आम्रपाली बुद्ध विहारामध्ये भगवान गौतम बुद्ध व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्ती प्रतिष्ठापना सोहळा मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.या कार्यक्रमात प्रमुख पाहूणे म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमास काळेगाव येथील पूज्य भंते महाविरो थेरो यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. यावेळी श्रामनेर सोनूत्तर,श्रामनेर राहूल, भारतीय बौध्द महासभेचे प्रा.बापू वाघमारे, दिनेश कांबळे, गौतम बनसोडे, राज भालेराव, मारोती कांबळे आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ते पुढे म्हणाले की, बौद्ध विहारे ही केवळ धार्मिक उपासनेची केंद्रे नसून ती सामाजिक आणि वैचारिक प्रबोधनाची केंद्रे बनली पाहिजेत. प्रत्येक बुद्ध विहारामध्ये दर्जेदार साहित्य असलेले पुस्तक कपाट अथवा ग्रंथालय उभारण्याची गरज आहे. पुस्तके ही ज्ञान, विचार आणि प्रगतीची साधने असून त्यांच्यामुळेच माणसाच्या बुद्धीचा विकास होतो. त्यामुळे वाचन संस्कृती वाढविण्यासाठी समाजाने विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला शिक्षणाचा संदेश आत्मसात करून युवकांनी समाज परिवर्तनाच्या कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. या वेळेस प्रा. बापू वाघमारे यांचे समायोचीत भाषणे झाली.तर पूज्य महाविरो थेरो यांच्या धम्मदेसनेनी कार्यक्रमाची सांगता झाली.या कार्यक्रमास परिसरातील उपासक-उपासिका, युवक, महिला तसेच समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.